# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे 18
## लेखा विभाग

दूरध्वनी क्र.:-०२०-६७३३१५१६ फॅक्स क्र. :२७४२५६०० E-mail :account @pcmcindia.gov.in
Website : www.pcmcindia.gov.in


---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८, लेखा विभाग
क्रमांक - लेखा/३२/कावि/48/2015
दिनांक - 18/02/2015

**<u>विषय</u> – सेवानिवृत्ती/ कुटुंब निवृत्ती प्रकरणे सादर करणे बाबत.....**

<u>परिपत्रक</u>

महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम 1982 नुसार शासकिय कर्मचारी सेवेतुन नियतवयोमान सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्ती, कुटुंब निवृत्ती वेतन, वैद्यकिय सेवानिवृत्ती, सक्तीने सेवानिवृत्ती इ. सर्व प्रकरणे पुर्तते कामी लेखा विभागाकडे प्राप्त होत असतात, अशा सेवानिवृत्त सेवकांना त्यांचे सेवानिवृत्तीचे दिवशी त्यांचे सर्व आर्थिक लाभांचे धनादेश वितरीत करणेची मागील काही वर्षांची प्रथा आहे तथापि सदरची प्रकरणे काही कारणास्तव संबंधित विभागाकडून वेळेत प्राप्त होत नाहीत तसेच प्रकरणात त्रुटी असलेचे कारणास्तव प्रकरणे विभागाकडे पुर्ततेकामी फेरसादर करणेत येतात. त्यामुळे अशा प्रकरणी सेवकांना सेवानिवृत्तीचे लाभ सेवानिवृत्ती समारंभांत देणे लेखा विभागास शक्य होत नाही.

सदर परिपत्राकाद्वारे सर्व **संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांना सुचित करणेत येते की वरील सर्व निवृत्ती/ कुटुंब निवृत्ती प्रकरणे तसेच भ.नि.नि. व गट विमा प्रकरणे (इकडील परिपत्रक क्र. लेखा/32/कावि/37/2014 दि. 07/02/2014) नुसार लेखा विभागास वेळेत सादर करणेत येवून संबंधित लिपिकांकडून त्याची पडताळणी करून घेणेत यावी.**

विलंबाने अथवा अर्धवट कागदपत्रांसह प्राप्त होणारी प्रकरणे विहित सेवानिवृत्ती दिनांकापुर्वी निकाली काढणे शक्य होत नाही या बाबत संबंधित विभागांनी दखल घेवुन प्रकरणे विनाविलंब लेखा विभागास सादर करावीत.

सेवानिवृत्त अधिका-यांना/ कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व इतर धनादेश वेळेत प्राप्त न झालेस व त्या बाबत संबंधितांची काही तक्रार आलेस महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२ मधील कलम १२९(अ), १२९(ब) अन्वये त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहिल याची विभाग प्रमुखांनी कृपया नोंद घ्यावी.

विविध **सेवानिवृत्ती, कुटुंब निवृत्ती, भ.नि.नि., गट विमा विषयक संच व माहिती PCMC Web Portal येथे उपलब्ध करणेत आले आहेत.**

**मुख्यलेखापाल**